# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/12/2023 (सोमवार) सकाळ

### केबल वायर चोरी

पो.स्टे. जलालखेडा:— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील पेठ ईसलामपुर शेत शिवार येथे दिनांक २३/१२/२०२३ चे ००.०० वा. ते दिनांक २४/१२/२०२३ चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मनोहर आनंदराव हजारे, वय ३२ वर्ष रा. पेठमुक्तापुर ता. नरखेड हा दि. २३/१२/२०२३ चे दुपारी १५.०० वा. दरम्यान पाणी ओलुन मोटारपंप बंद करून घरी आले व दि. २४/१२/२०२३ ला ७.३० वा. पाणी ओलण्या करिता जाम नदीवर मोटारपंप चालु करण्या करिता गेले असता मोटारला लागुन असलेला २० फुट केबल जुना वापरता किंमती ३००/— रू. चा दिसला नाही तसेच जयंत हरिभाउ माळोदे याचे जाम नदीवरील ४०० फुट केबल वायर किंमती १२००/— रू. तसेच गोपाल माळोदे यांचा ७० फुट केबल वायर किंमती १७५०/— रू. तसेच धनराज चौरे याचा ३०० फुट केबल वायर किंमती ९००/— रू. तसेच ज्ञानेश्वर गिरडकर याचा १२० फुट केबल वायर किंमती १८००/— रू. तसेच मारोतरा दुर्गे याचा १०० फुट केबल वायर किंमती १२००/— रू. तसेच किशोर वानोडे याचा १५० फुट केबल वायर किंमती २२५०/— रू. तसेच जाम नदीपासुन २ किमी असलेली शेतीतील विहीरीवरिल लक्ष्मण काळबांडे याचा ४० फुट केबल वायर किंमती ६००/— रू. तसेच अरून मोरे याच्या विहीरी वरील १२० फुट केबल वायर किंमती १८००/—रू. सर्व रा. पेठमुक्तापुर असा एकुण ३०७००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने जुना वापरता केबल वायर तोडुन चोरी करून घेवुन गेलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक अशिष हिरूडकर, ब. नं. ९०० पोस्टे जलालखेडा मो. नं. ९३५९३९११८६ हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील नगर परिषद कॉर्टर रामटेक कवडक दुधाळा रोड येथे दिनांक २३/१२/२०२३ चे २३.०० वा. ते २३.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— चरण शालीक परतेती, वय ४५ वर्षे रा. नगर परिषद रामटेक व **आरोपी नामे— मंगल पंधरे, रा. रामटेक** हे एकाच मोहल्ल्यातील रहीवासी असुन फिर्यादी कामावरून आल्यानंतर जेवण केल्यानंतर बाहेर फिरायला गेले असता मोहल्ल्यातील शेकोटीजवळ अंग सेकण्याकरिता गेले असता आरोपी हा दारू पिवुन येवुन शिवीगाळ करत होता तेव्हा फिर्यादी यांनी म्हटले की शिवीगाळ का करत आहे असे म्हटले असता आरोपी याने जवळच असलेली लाकडी काडी उचलुन फिर्यादी यांना मारहाण करून जखमी केले शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक भुरे मो. नं. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**